# विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून 'मेट्रो-३'ची स्थानके

**प्रतिनिधी, मुंबई**

'मेट्रो-३' या मार्गिकेवरील स्थानकांची रचना विद्यार्थ्यांच्या संकल्पनांमधून होणार आहे. स्थानकांच्या रचनेसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आणि ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन यांनी स्पर्धा आयोजित केली आहे.

अभियांत्रिकी, वास्तुकला, रचना, शहर विकास (इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, टाऊन प्लॅनिंग) या विद्याशाखांचे पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किमान ३ ते कमाल ५ विद्यार्थ्यांचा संघ असणे आवश्यक आहे. मेट्रो प्रशासनाकडून आवश्यक असलेली माहिती, नकाशे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येतील. स्थानकाची रचना, व्यवस्थापन यांचा आराखडा विद्यार्थ्यांनी तयार करायचा आहे. त्यामध्ये मनोरंजनाचे पर्याय, खुली जागा, स्थानक पर्यावरण पूरक असणे अपेक्षित आहे. संकल्पना आणि त्यानंतर त्याचे तपशील अशा दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचा विचार करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल. स्पर्धेची नोंदणी १० एप्रिलपासून सुरू होणार आहे. स्पर्धकांची मे किंवा जूनमध्ये कार्यशाळा घेण्यात येणार आहे आणि त्यानंतर महिन्याभरात त्यांनी आपल्या संकल्पनांचे सादरीकरण करायचे आहे. प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३० हजार रुपये आणि ठरवून दिलेल्या प्रत्येक निकषावरील सर्वोत्तम कल्पनेसाठी १५ हजार रुपये अशी पारितोषिके विजेत्यांना देण्यात येणार आहेत. स्पर्धेबाबत माहिती metro3competition@gmail.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.